# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं १०/२०१८

श्री. वसंत राजाराम पाटील — तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. भारती विद्यापीठ, भारती विद्यापीठ भवन, पुणे-३०
२. डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी ता.मिरज, जि.सांगली. — वि. प.

भारती विद्यापीठ, भारती विद्यापीठ भवन, पुणे यांचे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी, ता. मिरज, जि. सांगली यांचेकडील सेवानिवृत्त कर्मचारी श्री. वसंत राजाराम पाटील यांनी दिनांक २३/०१/२०१५ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी शांतीनिकेतन महाविद्यालय, सांगली येथे सन ०१/११/१९७८ पासून १९८५ पर्यंत (त्यानंतर बंद) व त्यानंतर मे.हायकोर्ट यांचे निकालानूसार बदली महाविद्यालय डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली (पुर्वीचे नाव ए.एस.सी. कॉलेज, सांगली) येथे दि. ३१/१०/१९८५ पासून मुळच्याच पदावर (प्रयोगशाळा सहाय्यक) हजर झालो. प्रयोगशाळा सहाय्यक हे पद सुध्दा बढतीस पात्र आहे. शांतिनिकेतन महाविद्यालयातील सेवकांची सेवाजेष्ठता अबाधित ठेवण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असल्यामुळे दि. ३१/१०/१९८५ नंतर भारती विद्यापीठाच्या अनुदान प्राप्त महाविद्यालयामध्ये बढतीची जागा निर्माण झाल्यास सेवाजेष्ठतेप्रमाणे माझा हक्क राहू शकतो. त्याप्रमाणे संस्था बढती प्रक्रियेनुसार माझ्या माहितीप्रमाणे वरिष्ठ लिपीक, मुख्यलिपिक व कार्यालय अधिक्षक या पदावर माझी बढतीने नेमणूक होणे आवश्यक होते. अशी माझी मागणी आहे, परंतु मला संस्थेने दि. २२/०२/२०१२ रोजी सिनियर क्लार्क चे प्रमोशन दिले आहे हे चुकीचे आहे.

बंद शांतिनिकेतन महाविद्यालयातील व दत्त महाविद्यालयाचे संदर्भातील मा.उच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे पूर्वीच्या महाविद्यालयातील सेवकांच्या सेवाजेष्ठता व आर्थिक लाभ अबाधित ठेवण्याचे निर्देश होते व त्याच निर्देशाचे पालन करणेबाबत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व महाराष्ट्र शासन यांनी महाविद्यालयास कळविले होते तरी त्याचा अंमल महाविद्यालय व पर्यायाने भारती विद्यापीठ यांनी न केल्याने आजपर्यंत माझ्या बढतीची जागा व आर्थिक लाभ यांना नुकसान पोहचत आहे. याबाबत मला न्याय मिळावा अशी माझी मागणी आहे.

मी मागासवर्गीय कर्मचारी आहे त्यामुळे भारती विद्यापीठातील सर्व अनुदानीत महाविद्यालयात कोठेही आणि कधीही बढतीच्या जागा निर्माण झाल्यास व त्या मागासवर्गीय रोस्टरनुसार भरावयाच्या झाल्यास मी एन.टी.सी. या प्रवर्गातील सेवाजेष्ठ सेवक असल्याने प्राधान्याने या जागांवर मी हक्क सांगू शकतो. परंतु महाविद्यालयाने पर्यायाने भारती विद्यापीठाने मागासवर्गीय रोस्टरनुसारही मला योग्य त्या बढत्या दिलेल्या नाहीत ही माझी तक्रार आहे.

तरी मला मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सेवाजेष्ठतेचा लाभ रोस्टरप्रमाणे ज्या त्या वेळी पदोन्नतीने मिळावा.

**संस्थेचा अभिप्राय :**

शासकीय नियमांचे पालन करून संस्थेने पदोन्नत्या दिलेल्या आहेत.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

संस्थेने शासकीय नियमानुसार कार्यवाही केलेली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

यातील तक्रारदाराने तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक २२१३/१९८५ मधील दि. १३/०९/१९८५ च्या आदेशानुसार तक्रारदार हे ज्या महाविद्यालयात कार्यरत होते ते भारती विद्यापीठ या संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी, ता. मिरज यामध्ये विलीन झाले. मा. उच्च न्यायालयाच्या

आदेशामध्ये व त्या अनुषंगाने पत्र क्रमांक. एनजीसी-१०८६/४१०५७/पाच अ शिक्षण संचालनालय (उ.शि) पुणे यांचे दि. १८/०८/१९८६ रोजीच्या पत्रानुसार कर्मचाऱ्यांची पूर्वीची सेवाज्येष्ठता अबाधित ठेवावी असे निर्देश आहेत. तथापि या आदेशानंतर सेवाज्येष्ठता सूची कधी प्रथमतः तयार करण्यात आली याचा उल्लेख नाही. तक्रारदार यांनी दाखल केलेल्या दि.२४/११/१९९३ च्या पत्रामध्ये 'महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानूसार मागासवर्गीय सेवकांच्या सेवा बढती बाबतच्या मागासवर्गीय रोस्टर आरक्षणाचे सर्व फायदे व सरंक्षण आपणास देण्याविषयी व या बढतीयोग्य पदासाठी माझा रोस्टरनुसार विचार करावा असे पत्र दिल्याचे दिसून येते.' तक्रारदार यांनी बिंदुनामावलीनुसार सेवाज्येष्ठता यादी व पदसंख्या दर्शविणारे दि. १७/१२/२००२ ची एक सूची दाखल केली आहे. त्यानूसार तक्रारदार यांना सन २००२ मध्ये पुढील पदोन्नतीने पदे भरविण्यात आले असल्याची कल्पना होती व सन २००३ मध्ये अर्ज देवून बढतीची मागणी केली. त्यानंतर दि.१८/१०/२०१३ व ३०/०४/२०१४ रोजी या विषयी मागणी केलेचे दिसून येते. परंतु प्रस्तुतचा तक्रार अर्ज दि. २३/०१/२०१५ रोजी दाखल करेपर्यंत या विषयावर मौन धारण केलेचे दिसून येते. तक्रारदार यांनी पदोन्नतीबाबत वेळेत दाद मागणेची कृती केलेचे दिसून येत नाही अगर या दरम्यान तक्रार निवारण समितीकडे दाद मागितलेचे दिसून येत नाही. या व्यतिरिक्त तक्रारदार यांना मा. उच्च न्यायालयात दाद मागता आली असती कारण जर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पूर्वीच्या महाविद्यालयातील सेवा अबाधित ठेवून सेवाज्येष्ठतेबद्दल संस्थेने कार्यवाही केली नसले तर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होतो व त्यानुसार उच्च न्यायालयात दाद मागणे क्रमप्राप्त होते.

तथापि तक्रारदार यांनी याप्रकरणी कोणतीही कृती केली नाही, तसेच त्यांना सेवानिवृत्ती दि. ३१/०६/२०१६ यांची कल्पना असून ही कोणत्याही कारणाशिवाय वेळेत दाद मागितली नाही असे या समितीच्या निर्देशनास येते. अशा कृतीमुळे तक्रारदार यांनी कोणत्याही उच्च पदाची जबाबदारी घेणे टाळलेले आहे व उशिराने तक्रार केली आहे. सबब या अर्जास मुदतीची बाधा येत आहे. तसेच प्रकरणांत हजर केलेली कागदपत्रे पाहता तक्रारदाराने हे सोदाहरण पटवून दिलेले नाही ज्यास तक्रारदाराची सेवाज्येष्ठता सूचीतील

स्थान कोठे निश्चित होते व त्याच्यापेक्षा कनिष्ठ कर्मचाऱ्यामुळे तक्रारदाराच्या बढतीवर कशाप्रकारे अन्याय झाला आहे.

विरूद्ध बाजूचा विचार करता, संस्थेने समितीस या प्रकरणात कोणतेही सहकार्य केलेले नाही व समितीस आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत तसेच संस्थेची बाजू समितीसमोर योग्यप्रकारे मांडली नाही. परंतु बचाव पक्षाचा ढिलाईचा फायदा तक्रारदारास देता येत नाही व तक्रारदार यांनी त्यांची बाजू सप्रमाण सिद्ध करणे आवश्यक होते. याप्रकरणी संस्थेच्या ताब्यातील कागदपत्रे तक्रारदारास उपलब्ध झाली असती परंतु, तक्रारदाराने तसा प्रयत्न केलेला नाही. या सर्व कारणास्तव तक्रारदार त्याची बाजू मांडणेस असमर्थ ठरला आहे असे या समितीचे मत आहे. या कारणास्तव अर्जामध्ये मागणी केलेली विनंती मान्य करता येणार नाही. सबब समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

तक्रारदार यांचा तक्रारअर्ज नामंजूर करण्यात येत आहे. झालेल्या निकालाच्या प्रती संबधिताना देऊन कळविणेत यावे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

दिनांक : 19 NOV 2020

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

सदस्य
(श्री. ए.ए. कुलकर्णी )

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर )

सदस्य सचिव
( श्रीमती ए.ए. कदम )

सदस्य
(श्री.एन.बी.गायकवाड)